# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे – ०४.

## जुलै–ऑगस्ट २०२३ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता १०वी) पुरवणी परीक्षेचे आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांबाबत.

### प्रकटन

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षा मार्च–२०२३ परीक्षेचा निकाल माहे जून २०२३ मध्ये जाहीर झालेला असून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे पुरवणी परीक्षा जुलै–ऑगस्ट २०२३ मध्ये घेण्यात येणार आहे. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षेस पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, ITI विषय घेऊन प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत. सदर परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षेचे आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने इ. १० वी साठी **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखा खालीलप्रमाणे –

| शुल्क प्रकार | माध्यमिक शाळांमार्फत पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (परीक्षेस प्रविष्ठ न झालेले), श्रेणीसुधार व तुरळक विषय घेऊन प्रविष्ठ होणारे, ITI विषय घेऊन प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा | माध्यमिक शाळांनी बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा | माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाच्या तारखा |
|---|---|---|---|
| नियमित शुल्क | बुधवार, दि. ०७/०६/२०२३ ते शुक्रवार, दि. १६/०६/२०२३ | गुरुवार, दि. ०८/०६/२०२३ ते गुरुवार, दि. २२/०६/२०२३ | शुक्रवार, दि. २३/०६/२०२३ |
| विलंब शुल्क | शनिवार, दि. १७/०६/२०२३ ते बुधवार, दि. २१/०६/२०२३ | | |

सदर परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी जुलै–ऑगस्ट २०२३ मध्ये होणाऱ्या परीक्षेची आवेदनपत्रे माध्यमिक शाळांमार्फत भरावी. सर्व माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापक यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१. ऑनलाईन आवेदनपत्र भरतांना मार्च–२०२३ परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची या परीक्षेतील माहिती आवेदनपत्रात ऑनलाईन घेता येईल.
२. उपरोक्त परीक्षेस प्रथमत: प्रविष्ठ झालेल्या व श्रेणीसुधार करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जुलै–ऑगस्ट २०२३ व मार्च २०२४ अशा लगतच्या दोन संधी उपलब्ध राहतील याची नोंद घ्यावी.
३. नियमित, विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क चलनाद्वारेच भरण्यात यावे.
४. सर्व विभागीय मंडळातील माध्यमिक शाळांनी निधारित शुल्क मंडळाने निश्चित केलेल्या बँकेच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच संबंधित विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.
५. आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांमध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

दिनांक :– ०५/०६/२०२३

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे – ४.

क्र.मुंविमं/माध्य.परीक्षा/ 239
वाशी, नवी मुंबई-४००७०३.
दिनांक - ०५ /०६/२०२३

प्रति,
मुख्याध्यापक/ प्राचार्य, मुंबई विभागीय कार्यक्षेत्रातील
सर्व मान्यताप्राप्त शाळा/मुंबई /बृन्हमुंबई /ठाणे /पालघर / रायगड जिल्हे

उपरोक्त पत्रानुसार मुख्याध्यापकांनी आपल्या स्तरावर नोंद घेवून त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

5-6-23

(डॉ.ज्योति परिहार)
विभागीय सह सचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई, ४०० ७०३.

प्रति:–
मुख्याध्यापक, सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा.
प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:–
१) शिक्षणाधिकारी(माध्य). ठाणे/रायगड/पालघर जिल्हा
२) शिक्षण निरीक्षक, पश्चिम/दक्षिण/उत्तर विभाग, मुंबई.
३) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, डहाणू/शहापूर/जव्हार/पेण.
यांनी आपल्या अधिपत्याखालील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांना परिपत्रक निदर्शनास आणावे.